MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात




अंबाजोगाई (प्रतिनिधी)
शहरातील दानशुरांनी केलेल्या अर्थ साहाय्यातुन जवळपास शंभर वृद्ध निराधारांना मान्यवरांच्या हस्ते किराणा साहित्त्याचे वितरण करण्यात आले. व्यासपीठावर रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष भागवत कांबळे,अरूण आसरडोहकर,कल्पना लोहीया,आदी उपस्थित होते. मानवलोक संस्थेचे कार्य सर्वदुर पर्यंत पोहंचले असून प्रत्यक्षरित्या दु:खितांचे अश्रु पुसण्या साठीच्या कामासाठी ही संस्था दानशूर व्यक्तींच्या अर्थ साहाय्यातुन वृध्द,अपंग,अंध, आजारग्रस्त उपेक्षितांसाठी कार्य करत असल्याचे मान्यवर पाहुण्यांनी सांगितले. सुरूवातीला संजना आपेट,सावित्री सागरे यांनी स्वागत गीत गायिले.कल्पना लोहिया यांनी प्रास्ताविकातून मानवलोक संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती दिली शाम सरवदे यांनी संचालन करून आभार मानले.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२६६ | बुधवार दि.१९ जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -266 | WEDNESDAY DT. 19 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# पालकमंत्री धनंजय मुंडे कलेक्टर दीपाताई मुंडे मुधोळ साहेब उघडा डोळे बघा नीट बी अँड सी चे तोंडे, बोराडे, भागवत, काम न करताच एमटी कंट्रक्शनला बोगस दोन कोटीचं बिल देण्याच्या तयारीत?

## बी अँड सी चे बोराडे यांची बीड शहरात एक मोठी इमारत आहे का नाही हे बोराडे यांनी सांगावं एवढी मोठी मार्केटच्या ठिकाणची इमारत मोक्याची जागा कुठून आली बोराडे यांनी सांगितलं तर बरं होईल?





- सार्वजनिक बांधकाम विभागात टक्केवारीचे आकडे वाढले आचारसहिता उठताच तोंडाला येईल तेवढे घेऊ लागले रवींद्र तोंडे चंद्रकांत बोराडे अक्षय भागवत करू लागला गोळा टक्केवारी तोंडी?
- आमदार संदीप क्षीरसागर यांनी लक्ष देणे काळाची गरज बीड विधानसभेमध्ये रुपयांच्या चुराडा?
- पंकजाताई मुंडे प्रीतम ताई मुंडे यांनी आणलेले कोट्यावधी रुपयाचा निधी कोणत्या गुत्तेदाराने घेऊन स्वतः गुत्तेदार झाला कोट्याधीश?
- माजी खासदार प्रीतम ताई मुंडे तुमच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून राजेंद्र मस्के ने या अगोदर सुद्धा किती टेंडर असेच बोगस पद्धतीने खाल्ले याची तुम्हाला जाणीव आहे का?
- एमटी कन्ट्रक्शनला राजकीय? वरदहस्त भाजपाचा समजायचा का?
- सार्वजनिक बांधकाम विभागात तोंडे बोराडे भागवत यांनी बोगस रस्ते नाल्या केल्याची अनेक तक्रारी आणि बीड तालुक्यातील बोगस बीले उचलून देत गुत्तेदारांकडून टक्केवारीत मिद्दे?
- सार्वजनिक बांधकाम विभागाचे रवि तोडे चंद्रकांत बोराडे अक्षय भागवत यांना एमटी कंट्रक्शनच्या दोन कोटीच्या बोगस बिलाची काळजी बोगस का?
- भागवत बोराडे, तोंडे, यांच्या कार्यकाळात अजून किती रस्ते डांबरी रस्ते सिमेंट रोड नाली रस्ते बोगस याची सखोल चौकशी होणे गरजेचे?
- अक्षय भागवत म्हणजे कमी वयामध्ये जास्त पैसा कमी होणारा बी अँड सी मधील चुलबुल पांडे?

बीड शहरासह बीड तालुक्यातील अनेक काम हे तोंडे भागवतसह अन्य सार्वजनिक बांधकाम विभाग नगर रोड बीड यांनी केलेले आहे एक व दोन मध्ये पट्ट्यावरील रुपयांचा भ्रष्टाचार असताना यामध्ये पालकमंत्री व जिल्हाधिकारी मूक घेऊन गप्प का?

- २० सिमेंट रोडनाल्या चे काम एम टी कंट्रक्शन ने काम न करताच पैसे उचलण्याच्या भूमिकेत?
- गेले पाच सहा महीने झाले ट्रेडरला पण काम का चालू नाही अजून.?
- अक्षय भागवत मूर्ती लहान कीर्ती महान बोराडेणी केली टक्केवारी घेऊन सगळ्या बी अँड सी मध्ये केली बोराडेनी घाणच घान ?
- पालकमंत्री कलेक्टर यांनी लक्ष देऊन संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागांमध्ये चाललेला कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार थांबविणे गरजेचे?





एमपी कंट्रक्शन ला नगर विकास मंत्रालय मुंबई कडून आणलेला निधी नगरपरिषदेमार्फत उचलायचा होता परंतु नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी नेता ताई अंधारे यांनी स्पष्ट नकार दिला आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग चे तोंडे बोराडे भागवत यांना तशी धरत नगरपरिषद कडून एजन्सी स्वतःच्या भावाच्या नावावर असलेल्या एमटी कंट्रक्शन ला हा निधी वर्ग करत बीड नगर परिषदेकडून ना हरकत प्रमाणपत्र घेत बीड नगरपरिषद ऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग बीड नगर रोड यांच्यामार्फत फुकटचे दोन कोटी रुपये उचलण्याची तयारी जोरात केली परंतु ती तयारी त्यांची बीड कर कधीही यशस्वी होऊन देणार नाहीत नगरपरिषद ऐवजी बी अँड सी कडून पैसे उचलण्याचा डाव भाजपचा?

**नगर विकास मंत्रालय मुंबई कडून कोट्यावधीचा निधी आणून बीडमध्ये चुराडा वाचा पुढील अंकामध्ये कोणत्या नेत्याने किती निधी आणला आणि कुठे कसा खर्च केला यामध्ये महायुतीचे दिग्गज नेत्यांचा समावेश?**

बीड /प्रतिनिधी
बीड नगरपरिषद अंतर्गत नगर विकास खाते मार्फत मंत्रालयातून नगर विकास मंत्री यांच्यामार्फत सत्तेच्या काळामध्ये सत्तेच्या जोरावर फडवणीस शिंदे पवार यांच्या सरकारमधील पदाधिकारी जे की भाजपाचे विद्यमान जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी यावेळी बीड शहरांमध्ये आणला परंतु यावेळी निधी आणत असताना कोट्यावधी रुपयाचा निधी ज्या भागातील काम झालेले आहेत त्याच भागातील नाले रस्त्या साठी खर्च करायचा हा फक्त कागदावर दाखवलेला आहे याचाच एक भाग म्हणून पाच ते सहा महिन्यापूर्वी एमटी कंट्रक्शन वरती एक दोन कोटी रुपयांचे प्रत्येकी २० काम जे की एमटी कंट्रक्शन यावरती ंडर करून घेतले हे टेंडर अधिकारी कर्मचारी यांना हाताशी धरून एमटी कंट्रक्शन ने सर्व बाजू तपासत व

**अधिकार्यांना मॅनेज करत दोन कोटीचे टेंडर एम टी कंट्रक्शन घेतले**

खरे परंतु त्या २० कामापैकी एकही काम न करता यावेळी बी अँड सी चे चंद्रकांत बोराडे अक्षय भागवत यांनी अक्षरशा नंगानाच चालवला आहे. याचाच एक भाग म्हणून या वीस काम पैकी जवळपास दोन ते तीन काम फक्त करून बाकीचे १६ ते १७ काम हे पहिल्यांदाच बीड नगर परिषदेने सिताई कंट्रक्शन मार्फत केलेले असताना सुद्धा यावेळी मात्र सिताई कंट्रक्शन ने केलेल्या कामात वरतीच रस्त्यावर रस्ते दाखवून एम टी कंट्रक्शन हे पैसे उचलत आहे बीड नगर परिषदेने या अगोदर सिताई कंट्रक्शन कडून अनेक भागातील बीड शहराच्या कानाकोपऱ्यातील काम नियमाप्रमाणे करून घेतलेले आहेत परंतु एमटी कंट्रक्शन ने त्याच कामावरती आम्ही काम केले असे घासून कोट्यावधी रुपयांचा निधी एमटी कंट्रक्शन लाटण्याच्या तयारीत असल्याची चर्चा रोड लागली आहे का असं म्हणण्यापेक्षा त्यांनी अक्षरशः दोन कोटी रुपयांचे बिल उचलण्यासाठी जोर लावण्याची चर्चा मात्र नक्कीच सार्वजनिक बांधकाम परिसरात चालू आहे.

रस्त्यावर रस्ते दाखवून झाल्याचे बोगस बिल उचलण्याची तयारी अंतिम टप्प्यात

बीड शहरातील नगरपरिषद अंतर्गत या अगोदरच या वीस प्रभागातील जवळपास १७ काम हे बीड नगरपरिषद ने वेगवेगळ्या वेगळ्या कंट्रक्शन कडून केलेले आहेत संबंधित निधी हा बीड नगरपरिषद ने खर्च करून या भागातील गल्लीबोळातील सिमेंट रोड नाली रस्ते फेवर ब्लॉक चे काम केलेले आहे परंतु हे काम बीड शहरातील भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी भारतीय जनता पार्टीच्या माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांच्याकडून पाठपुरावा करत संबंधित निधी हा फक्त बोगस पद्धतीने गुत्तेदारी करण्यासाठी व स्वतःच्या भावाला पोचण्यासाठी म्हणजेच मदन मस्के व राजेंद्र मस्के हे सख्ख्या भाऊ शासनाच्या निधी हडप करण्याच्या तयारीत आहेत तर एम टी कंट्रक्शन ने ये कोण २० काम पैकी दोन ते तीन काम करून बाकीचे सर्व बिल त्यांना बीएमसीचे अधिकारी तोंडे बोराडे व भागवत यांच्या पुण्याईने व टक्केवारी मध्ये भागीदारी मुळे मिळणार असल्यामुळे त्यांना या अगोदर सुद्धा कोट्यावधी पाहिजे काम भागवत तोंडे बोराडे यांनी दिलेले आहेत का हे तपासणे गरजेचे आहे?

एमटी कंट्रक्शन गेल्या पाच महिन्यापासून हे काम का सुरू केले सुरू केले नाही याची चौकशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे भागवत तोंडे बोराडे यांना केली असता ते उडवडीचे उत्तरे देत आहेत त्यांचे काम खूप चांगले आहे आणि त्यांचे बिल निघून द्या त्यांनी काम केलेले आहेत अशा आणून बोराडे भागवत तोंडे हे गुत्तेदारांना पोचण्यासाठी कटिबद्ध आहेत हे मात्र निश्चित होत आहे तर तोंडे बोराडे आणि भागवत यांचा जर एकूण इतिहास काढला तर भ्रष्टाचार आणि बरबटलेले तोंडे बोराडे आणि भागवत हे जनतेला तोंड दाखवायचा लाईक राहणार नाहीत लवकरच बोराडे तोंडे आणि भागवत यांचे कार्यकारणाने जनतेसमोर येणार आहेत?

# ओबीसी आंदोलनाचा ७वा दिवस



## लक्ष्मण हाकेंची प्रकृती खालावली, डॉक्टरांनी वर्तवला पक्षाघाताचा धोका; बीडमध्ये चक्काजाम

जालना – मराठा समाजाच्या आंदोलनानंतर आता राज्यात ओबीसी समाजाचे देखील आंदोलन सुरू झाले आहे. या आंदोलनाचा आजचा सातवा दिवस आहे. यात आंदोलनकर्ते प्रा. लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे या दोघांची प्रकृती खालावली आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळानेही उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलन थांबवण्याची विनंती केली होती. मात्र, प्रा. लक्ष्मण हाके हे आंदोलनावर ठाम आहेत. दरम्यान आज त्यांची प्रकृती पुन्हा खालावली आहे. त्यांना हृदयविकार किंवा पक्षघाताचा धोका असल्याची भीती डॉक्टरांनी वर्तवली आहे.

या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा वाढला आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आमदार जितेंद्र आव्हाड आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर देखील हाके यांची भेट घेण्याची शक्यता आहे.

मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची हमी सरकारने द्यावी, अशी मागणी ओबीसी समाजाकडून करण्यात आली आहे. त्यासाठी ओबीसी समाजाचे प्रा. लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे हे उपोषण करत आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस आहे.

# मोदीजी, शिक्षण अन् न्यायव्यवस्था सुधारेल का?

## उमेदवारी अर्जासोबत सादर केलेल्या माहितीतील करोडो रुपये कुठून, कसे येतात? त्यांचे व्यवसाय हे सारं न्यायव्यवस्था तपासणार का?

**प्रशांत बाफना शेवगाव**
**८०५५४४०३८५। सारिपाट**

**बहुमताच्या आकडेवारीवर नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकार्यांनी एकदाची शपथ घेतली आणि लोकशाहीचा सुरू झालेला उत्सव एकदाचा संपला. लोकशाहीच्या प्रक्रियेत मतदारांचा कौल मान्यच केला पाहिजे. या प्रक्रियेत कधी कधी आपण बिर्याणीची ऑर्डर देतो आणि आपल्या पुढ्यात खिचडी येते असेही होते. यावेळी काही मतदारसंघात तसेच झाले. मात्र, आता त्या चर्चेची वेळ निघून गेली आहे. कुणाचे काय चुकले यापेक्षा आलेल्या सरकारने काय करावे आणि जनतेच्या त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत हे त्यांनी समजून घेण्याची गरज आहे. जाहीरनामा अथवा वचननामा राजकीय पक्ष जाहीर करतात. सरकार काय देणार याहीपेक्षा जनतेला कशाची गरज आहे हे महत्वाचे! शिक्षण आणि न्याय व्यवस्था दोन महत्वाच्या बाबींवर लक्ष देण्याची आज मोठी गरज आहे.**

**राजकीय पक्षांच्या उमेदवाराच्या निवडणुकीतील उमेदवारी अर्जाबरोबर कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीची विवरणे सादर होत असतात. हे करोडो रुपये कुठून येतात, कसे येतात, व्यवसाय काय या सार्याची माहिती न्यायव्यवस्था तपासणार आहे का या मुख्य प्रश्नाच्या खोलात जाण्याची गरज आहे.**

आपल्या देशात जलद न्यायदानाची प्रक्रिया होते का खरा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर देशात तिसर्यांदा सत्तेत बसलेल्या नरेंद्र मोदी यांनी देण्याची गरज आहे. खरं यर न्याय संस्थेतील दिरंगाई वाढतेच आहे. वर्षानुवर्षे लाखो केसेस प्रलंबित राहतात. वेळ, पैसा वाया जातो. योग्य वेळात योग्य न्याय मिळाला तर त्याला काही अर्थ. कायद्याचा समाजात धाक निर्माण झाला पाहिजे. विशेष करून राजकारणी, लोकप्रतिनिधी हे नैतिक दृष्ट्या स्वच्छच असले पाहिजेत. निवडणुकीला उभे राहणारे कितीतरी प्रतिनिधी गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात. तुरुंगात शिक्षा भोगून आलेले सत्तेत येतात. यावर कायद्याचा, न्याय संस्थेचा निर्बंध हवा. 'राजकारणी मंडळींविरुद्ध खोटे गुन्हे दाखल होतात' ही पळवाट चालणार नाही. आधी दोषमुक्त व्हा अन् मगच सत्तेत, राजकारणात येण्याचा विचार करा. या पुढार्यांच्या निवडणुकीच्या अर्जाबरोबर कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीची विवरणे सादर होत असतात. हे करोडो रुपये कुठून येतात, कसे येतात, व्यवसाय काय, हजारो एकर जमीन यांच्या नावे आली कशी याचा न्यायसंस्थेने आधी तपास करायला हवा. निवडणूक आयोगानेदेखील लेखाजोखा नीट तपासायला हवा. सामान्य शिकल्या सवरलेल्या व्यक्तीला कष्ट करूनही एवढी संपत्ती गोळा करता येत नाही. मग या मंडळींची जादू काय याचा तपास करणारी सक्षम यंत्रणा हवी. प्रत्येकाने कायदे पाळलेच पाहिजेत. न्याय संस्थेने जमाखोरीवर विशेष लक्ष, नियंत्रण ठेवले पाहिजे असे सत्तेतील कारभार्यांना वाटणार नाहीच नाही!

स्वातंत्र्यापासून ते कालपर्यंतच्या कारभार्यांनी शिक्षणाला प्राधान्य दिल्याचा कांगावा केला जात असला तरी त्यात खर्या अर्थाने गुणवत्तेच्या आधारे विचार झाला आहे काय? अगदी प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत आपल्याकडे गुणवत्तेच्या बाबतीत 'आनंदी आनंद' आहे. संख्या भरपूर वाढली. पण बाजारीकरणामुळे गुणवत्ता तितकीच घसरली हे सत्य. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आले खरे. पण ते अहवाल, फायली यांपुरतेच. त्यातल्या अनेक बाबी आधीही होत्या. अगदी शांतिनिकेतन काळापासून होत्या. हे धोरण राष्ट्रीय आहे का? तर तेही नाही. कारण अनेक राज्यांनी त्याकडे चक्क पाठ फिरवली आहे. इतर ठिकाणी या धोरणावर चर्चा, कार्यशाळा, परिसंवाद असे सोहळे सुरू आहेत. अंमलबजावणीबाबत आनंदी आनंद अशी परिस्थिती आहे.

खरी गरज उत्तम शिक्षकाची आहे. सरकारी शाळांतील सुविधा, तेथील शिक्षकाची संख्या, उपलब्धता, त्यांचा दर्जा हा गंभीर काळजीचा विषय. तीच परिस्थिती महाविद्यालये, विद्यापीठे, आयआयटी, एनआयटी अशा उच्च शिक्षण संस्थांत आहे. हव्या त्या संख्येत, योग्य त्याच व्यक्तीची केवळ गुणवत्तेच्या आधारे नियुक्ती, त्यांना सातत्याने प्रशिक्षण हे सारे शिक्षक, प्राध्यापक यांच्याबाबतीत प्राधान्याने गरजेचे आहे. न्यायदान- शिक्षण क्षेत्राबरोबर आरोग्य सेवा, न्यायसंस्था सुधारणेदेखील फार गरजेचे आहे. अजूनही सरकारी दवाखान्यातील परिस्थिती दयनीय आहे. पुरेसे डॉटर्स नाहीत.नर्सेस नाहीत, स्वच्छता नाही, मेडिकल उपकरणे नाहीत, इमर्जन्सी व्यवस्था नाही अशी परिस्थिती आहे. खेड्यापाड्यात तर कुपोषण, स्वच्छता, बेसिक आरोग्य व्यवस्था गरिबांना अजूनही उपलब्ध नाही. शहरांतील कॉर्पोरेट हॉस्पिटडे महागडी, लुटारू वृत्तीची आहेत! गरीब स्त्रिया, बालके यांच्या आरोग्य सुविधांकडे लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचा अहवाल आजही तयार होत असेल तर आपल्या देशात नक्की कशाचा विकास झालाय याचे उत्तर सत्तेतील कारभार्यांना द्यावेच लागणार आहे.

सत्ताधार्यांबद्दल जनतेच्या मनात आदराची भावना राहावी किंवा सत्तेतील कारभारी आपल्यासाठी काहीतरी करत असल्याचे मत निर्माण व्हावे या भावनेतून गेल्या काही वर्षात काही फुकट योजना सुरू झाल्या. खरंतर काहीही काहीही फुकट देऊच नये. प्रत्येक सुविधेला मोल हवेच. धान्य फुकट, वीज- पाणी फुकट अशा प्रलोभनांमुळे माणसे आळशी होतात. निरुद्योगी माणसे समाजाला घातक ठरतात. गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. त्यापेक्षा सर्वांना काही ना काही काम द्या. अनेक क्षेत्रांत मनुष्यबळाची प्रचंड गरज आहे. तिथे बेरोजगार तरुणांना रोजगार द्या. हवे ते प्रशिक्षण द्या. कष्टाने कमावल्याचा आनंद मिळू द्या. फुकट्या सवलतीमुळे मोर्चे, आंदोलने येथील गर्दी, गुन्हेगारी वाढते आहे. माणसाच्या आवश्यक गरजा पुरवण्याइतकी कमाई ज्याची त्याने केलीच पाहिजे. आपल्याला उद्योगी तरुण पिढी निर्माण करायची असल्याचे भान सत्ताधिशांनी ठेवावे. नसता फुकट देऊन आळशी पिढी तयार करण्याचे पाप त्यांच्या माथी फुटणार!

ग्रामीण भागातील शेतकरी, गरीब, वंचित समाज यांचे जीवनमान सुधारण्यासाठी तात्पुरते नव्हे तर ठोस धोरण कायमस्वरूपी आखले व स्वीकारले पाहिजे. आपले उपाय नेहमी तात्पुरती मलमपट्टी केल्यासारखे असतात. त्याने समस्या सुटत नाही. समस्या पुढे ढकलली जाते एवढेच! समाजात आर्थिक विषमता, सामाजिक तेढ वाढते आहे. जातीधर्माच्या नावावर नसलेले प्रश्न उकरून काढले जात आहेत. हे राजकारण आता थांबले पाहिजे. अशा निरर्थक गोष्टींत वेळ घालवून राजकीय लाभ लुटण्यापेक्षा पर्यावरण, ग्लोबल वॉर्मिंग, उत्तम आरोग्य सुविधा, सामाजिक सलोखा, उत्तम शिक्षण, मजबूत संरक्षण यंत्रणा हे सारे जास्त महत्त्वाचे आहे. नव्या सरकारने आपल्या अजेंड्यात या गोष्टींना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. दहा वर्षात यावर काम झाले असेल तर मग आजही हे विषय पुन्हा तसेच का दिसतात याचेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

शेतकरी विरोधात गेल्याचे आत्मचिंतन होणार का?

शेतकर्यांच्या नाराजीचा लोकसभा निवडणुकीत फटका बसल्याची कबुली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली असतानाच कांदा प्रश्नामुळे महायुतीचे निवडणुकीत नुकसान झाल्याची भावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केल्याने भाजपच्या या दोन्ही मित्र पक्षांनी पराभवाचे खापर अप्रत्यक्षपणे केंद्रातील भाजप सरकारवर फोडले आहे. अजित पवार हे फटकळ आणि कसलीही भीडभाड न बाळगता बोलणारे म्हणून प्रसिद्ध. या उलट मुख्यमंत्री शिंदे हे फार तोलूनमापून व्यक्त होणारे. तरीही शिंदे यांनी जाहीरपणे शेतकर्यांच्या नाराजीचा फटका बसल्याचे मतप्रदर्शन करणे यावरून त्यांनाही हा प्रश्न किती गंभीर आहे याचा अंदाज आला असणार. विरोधकांच्या खोट्या कथानकामुळे अपयश आल्याचा निष्कर्ष काढून राज्यातील भाजप नेते मोकळे झाले असले तरी शेतकरी वर्ग एवढा विरोधात का गेला याचे आत्मचिंतन राज्यातील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना करण्याची गरज आहे.

# पालकमंत्री धनजय मुंडे यांना रायमोहा बारा वाड्या परिसर शिरुर कासार पोलीस ठाण्याला जोडण्यासाठी निवेदनाद्वारे साकडे-गोकुळ सानप,रायमोहाकर

**शिरुर (प्रतिनिधी)**
**शिरुर कासार तालुक्यातील रायमोहा आणि परिसरातील बारा वाड्यांना पोलीस ठाणे पाटोदा व कोर्ट शिरूर कासार असल्याने जनतेला याचा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याने आणि अनेक वर्षाचा हा प्रश्न मार्गी लागण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना रायमोहा येथील माजी मंत्री पंकजा मुंडे, माजी खासदार प्रितम मुंडे यांचे निष्ठावंत शिल्लेदार गोकुळ सानप ,रायमोहाकर यांनी प्रत्यक्ष भेटुन**



**निवेदनाद्वारे पालकमंत्री मुंडे यांना साकडे घातले आहे**

पुढे दिलेल्या लेखी निवेदनात माजी मंत्री पंकजा मुंडे, माजी खासदार प्रितम मुंडे यांचे निष्ठावंत शिल्लेदार गोकुळ सानप ,रायमोहाकर म्हणाले की रायमोहा पासुन पाटोदा अंतर २८ कि मी तर शिरुर कासार अंतर ११ कि मी आहे आणि रायमोहा बारा वाड्या परिसराला दळणवळण करण्यासाठी शिरूर कासार सोईचे ठरत आहे तर त्यामुळे रायमोहा बारा वाड्या परिसर पाटोदा पोलीस ठाण्याकडून काढून घेऊन शिरूर कासार पोलीस ठाण्याला जोडण्यात यावा अशी आग्राही मागणी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माजी मंत्री पंकजा मुंडे, माजी खासदार प्रितम मुंडे यांचे निष्ठावंत शिल्लेदार गोकुळ सानप, रायमोहाकर यांनी केली आहे यावर पालकमंत्री मुंडे काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे

# लऊळ नं.१.दलित वस्ती येथील पथदिवे दुरुस्त व सरळ करण्यात यावे - वशिष्ठ रासवे

## ग्रामविकास अधिकारी लऊळ नं.१ यांचे दुर्लक्ष

माजलगाव / प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामपंचायत लऊळ नं.१ ही एक ना अनेक कारणांसाठी वादाच्या भोवऱ्यात सापडलेली ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. येथील ग्रामस्थांच्या या ग्रामपंचायतीबाबत अनेक तक्रारी या लेखी व निवेदनाच्या माध्यमातून गेली अनेक महिन्यापासून वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रकाशित तसेच बातम्यांच्या माध्यमातून ऐकवयास व वाचन स्वरूपात सर्वांना माहिती आहेत. मात्र या ठिकाणी असलेले लोकसेवक तसेच शासकीय अधिकारी यांच्यावर कोणाचा तरी राजकीय वरदहस्त असल्यामुळे कुणालाही जुमानत नसून येथील ग्रामपंचायतचा सर्व कारभार हा मनमानी पणे चालू आहे. काही महिन्यापूर्वी वृत्तपत्रांमध्ये ठळक स्वरूपात लऊळ नं.१ येथील ग्रामपंचायत मध्ये बोगस ठराव घेऊन उचललेली बोगस बिले पास करून गुत्तेदार, अधिकारी, कर्मचारी यांची चौकशी करा- विजय मोरे याने ऑनलाइन तक्रार करून चौकशी केली होती या आशयाच्या बातम्या प्रकाशित झाल्या परंतु का कोणास ठाऊक. याची दखल कुठल्याही अधिकाऱ्यांनी घेतली नाही! या सर्व प्रकरणाची माहिती निवेदन करते विजय मोरे यांनी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत मागिवली पण या गोष्टीला अनेक महिने उलटून देखील बोगस ठराव घेऊन दिल्या गेलेल्या कामांचे ठराव रजिस्टर कोठे आहे व त्यात नोंदणी आहे का? इ - पेमेंट सिस्टीम रेकॉर्ड पेमेंट साधर रेकॉर्ड २०१८ ते २०२३ किती कामे झाले नाहीत ही माहिती तक्रारदारास अद्याप पर्यंत देण्यात आलेली नाही त्यामुळे ग्रामपंचायत लूऊळ नं.१ या ठिकाणी ग्रामस्थांच्या तक्रारीचे निवारण होणे हे कठीण आहे असे दिसून येते.

तर दि.१८/०६/२०२४ रोजी येथीलच वशिष्ठ रासवे यांनी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्र.२ मधील पथदिवे दुरुस्ती व झुकलेले विद्युत पोल सरळ करण्यासाठी निवेदन दिले असून या



निवेदनामध्ये त्यांनी म्हटले आहे की, लऊळ नं.१ येथील वार्ड क्र. २ येथील पथदिवे हे बऱ्याच दिवसापासून बंद पडलेले आहेत. या गोष्टीची ग्रामपंचायतला वारंवार कल्पना देऊन देखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे या वार्डातील पथदिवे खराब असल्याकारणाने रात्रीच्या वेळी या रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. याचा त्रास येथील नागरिकांना सहन करावा लागत असून रात्रीच्या वेळी येथील नागरिकांना येण्या जाण्याचा त्रास होत आहे. सद्य परिस्थितीमध्ये पावसाळ्याचे दिवस असून पावसामुळे रस्त्याच्या आजूबाजूस गवत वाढेल यामुळे येथून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना विंचू, सापाची भीती असल्याकारणाने येथून वास्तव्य व रहदारी करणाऱ्या नागरिकांच्या जीवतास धोका निर्माण होऊ शकतो. अशा आशयाचे निवेदन निवेदक वशिष्ठ पांडुरंग रासवे यांनी ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय लऊळ यांना दिले आहे तरी यावर ग्रामविकास अधिकारी हे काय निर्णय घेतात याकडे समस्त ग्रामस्थांचे लक्ष लागलेले आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथील मुख्यरस्त्याचं पावसाच्या पाण्याने नदीनाल्यात रूपांतर

## शहरातील नाल्यांच बोगस बांध काम

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरातील छत्रपती संभाजी नगर येथील परिसरात नाल्यांच सांडपाणी रहीवास्यांच्या घरात घुसले असून सर्व नाल्या जागो-जागी लीक असल्याने व नाल्यांचा उतार विरुद्ध दिशेला काढलेला असल्याने नाल्या सांडपाण्यानी तुडुंब भरलेल्या व एकाच जागेवर थांबलेल पाणी या गोष्टीचा सर्वात जास्त त्रास शहरातील व्यापाऱ्यांना होत आहे. या बाबत कित्तेक वेळा संबंधित नगरसेवक व गुत्तेदार यांना पोटतिडकीने सांगुनही उडवा-उडवी चे उत्तर व दुरुस्ती चे काम लवकरच होईल म्हणुन खोटे आश्वासन देवून आत्ता पर्यंत फक्त चालढकलच करत आले आहेत. एवढंच नाही तर परिसरात पादचारांना चालण्यासाठी काट्याची कसरत करावी लागत आहे. याचा परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याने नगरपालिकेने तात्काळ नाली सफाई व दुरुस्ती करावी नसता येथील नागरिकांचा आमरण उपोषणास बसण्याचा व आंदोलन करण्याचा निर्धार केला असल्याचे बोलले जात आहे.



**शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त वडवणी तालुका शिवसेनेच्या वतीने गोर गरीब, कष्टकरी, शेतकरी ,यांना छत्री चे वाटप करण्यात आले या वेळी उपस्थित शिवसेना वडवणी तालुका प्रमुख मा विनायक बप्पा मुळे, शहर प्रमुख शिवाजी दुटाळ, उपतालुका प्रमुख अशोक गोंडे, अंबादास जाधव, सरपंच संजय धपाटे, युवासेनेचे नवनाथ मोरे, अजय खांडवे, उध्दव काकडे, आणा नागवे, विष्णुपंत मस्के, आणासाहेब शिंदे, आतुल राऊत, अकाश सावंत, तात्या जाधव, व उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठय़ा संख्येने उपस्थित होते!!**

# शिवसंग्रामची बीड शहर कार्यकारिणी जाहीर

## शहर शिवसंग्राम कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे-डॉ.ज्योतीताई मेटे

बीड (प्रतिनिधी)

आगामी काळात येऊ घातलेल्या बीड नगरपालिका निवडणूक,पक्ष बांधणी व विस्ताराच्या अनुषंगाने शिवसंग्राम भवन, नगर नाका,बीड येथे काल रविवार,दिनांक १६ जून रोजी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा आदरणीय डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली व्यापक बैठक संपन्न झाली. शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोलंगडे, जिल्हा सरचिटणीस अनिल भाऊ घुमरे, बीड विधानसभा अध्यक्ष प्रा.सुभाष जाधव सर यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी शहर कार्यकारिणी जाहीर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्धीप्रमुख मनोज जाधव यांनी केले.

शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा आदरणीय डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत बीड शहरातील विविध प्रभागातील प्रभाग प्रमुखांच्या सोबतच शहर कार्यकारीणी सदस्यांच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत यात प्रामुख्याने बीड शहर अध्यक्ष, शहर उपाध्यक्ष, शहर सचिव, शहर सहसचिव कोषाध्यक्ष संघटक व विभाग प्रमुख यांच्या निवडी करण्यात आलेल्या आहेत.यामध्ये शहराध्यक्षपदी सुहास पाटील, शहर उपाध्यक्षपदी शेषेराव तांबे, सातीराम ढोले व शेख नदीम शेख गणी, शहर सचिवपदी गोपीनाथ देशपांडे, शहर सहसचिवपदी हनुमंत पवार, शहर कोषाध्यक्ष हरीश शिंदे, शहर संघटक सुशील कांबळे, तर विभाग प्रमुख म्हणून हरिश्चंद्र ठोसर,कुंदन गायकवाड,नितीन आगवान यांच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या



हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी आगामी काळात झोकून देवून काम करण्याची तयारी ठेवावी तसेच प्रत्येक तरुणांनी बदल करायची हिंम्मत दाखवली पाहिजे . सकारात्मकता, आक्रमकपणा कार्यकर्त्यांने अंगी बाणावे असे सांगत डॉ.ज्योतीताई मेटे यांनी त्यांना पुढील वाटचालीस व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी साधनाताई दातखिळ,संगीताताई ठोसर, अशोक लोकरे,अनिकेत देशपांडे,प्रशांत डोरले,शेख अखिल भाई, शेख कुतुब भाई, शेख आबेद भाई, मुकुंद गोरे, कैलास शेजाळ, शेख लालाभाई, शकील खान शैलेश सुरवसे, अशोक ढोले, प्रकाश तावरे, शेख रहीम यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गेवराई तालुक्यातून बेफाम अवैध वाळू उपसा; डीवायएसपी राजगुरू हे फक्त नावालाच?



आज पेठ बीड ईस्लामपुरा या सर्व भागातील सर्व जेष्ट नागरीकांनी विद्युत पुरवठा समस्यांच्या संदर्भात राष्ट्रवादी काँगेसचे या भागातील नेते तथा समाज सेवक सय्यद ईमतीयाज एकबाल, सय्यद शरीफभाई केज जिल्हा उपरुग्णालय संचालक,राष्ट्रवादी काँग्रेसवचे युवा नेते श्री नितीनजी जायभाये, समाजसेवक सय्यद फय्याज भाई, सदर शेख अब्दुल रहिम भाई, हाफेज मोईनोद्दीन साहाब शहर काजी वक्फ बोर्ड यांचे समवेत माळीवेस मुख्य कार्यलय च.ड.ए.इ येथे असंख्य नागरीकांच्या समवेत संबधीत अशिकाऱ्यांची भेट घेवुन पेठ बीड भागातील विद्युत पुरवठा समस्याच्या संदर्भात चर्चा केली.नागरीकंच्या गैरसोयी विषयी सर्व बाबी सांगीतल्या व तत्काळ उपाय योजना करण्या साठी लेखी निवेदन देण्यात आले. तरी च.डए. इ कार्यलय अभियत्ता यानी सर्वे करुन तात्काळ दुरूस्ती उपाय योजना करण्याचे आश्वासन दिले. या प्रसंगी पेठ बीड भागातील अकबर अत्तार, शेख अनवर, शेख अलिम, शेख ताजोद्दीन शेख आवेज, शेख युनुस, सय्यद साजेद सय्यद गफ्फार, नईम अत्तार, शेख सादेख, शेख सुल्तान, उबेद मोमीन, मुसा भाई, फेरोज पठाण, हाफेज आजम, शेख उस्मान, आदी नागरीकांची प्रमुख उपस्थीती होती.

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातून जाणाऱ्या गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा जोरात सुरू आहे. याकडे महसूल विभागाचे आणि डीवायएसपी नीरज राजगुरू हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून डोळेझाक करीत असल्याची चर्चा सुरू आहे. हा अवैध वाळू उपसा तातडीने थांबवावा अशी मागणी होत आहे. गेवराई तालुक्यातील गुंतेगाव, राक्षसभुवन, माळसपिंपळगाव, बोरगाव, सावरगाव, हिंगणगाव, जोगलादेवी आदी ठिकाणाहून अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणात रोजरोज बेसुमार उपसा सुरू आहे. याकडे डीवायएसपी नीरज राजगुरू तसेच संबंधित पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हे वाळू माफियाविरूद्ध ठोस कारवाई करीत नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच वाळू माफिया विरोधात ठोस कारवाई करण्याची हिंमत होत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पोलिसांच्या दुर्लक्षामुळे वाळू माफियांची हिंमत वाढत चालली आहे. वाळू माफियांना पोलीस प्रशासन पाठीशी घालत तर नाही ना? असे नागरिकांतून दबक्या आवाजात बोलले जात आहे.



संबंधित पोलिस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वरील नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून अहमदनगर, औरंगाबाद या जिल्ह्यात वाळू जात आहे. सततच्या वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या अवजड वाहतूकीमुळे गेवराई तालुक्यातील रस्त्यांची दैना झाली आहे. रस्ते दुरुस्त केल्यानंतरही वाळू वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे तात्काळ खराब होतात. त्यामुळे वाहन चालक व स्थानिक नागरिकांचे हाल होत आहेत. शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांनाही अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे डीवायएसपी नीरज राजगुरू याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. गेवराई तालुक्यात वाळू माफियांनी प्रचंड दहशत निर्माण केली आहे. पोलीस आणि महसूल कर्मचाऱ्यांसोबत असलेल्या अर्थपूर्ण संबंधांमुळे या वाळू माफियां विरोधात बोलण्याचे धाडस कोणी करीत नाही.

वाळू वाहतूक करणारे हायवा, डंपर, ट्रॅक्टररसह इतर वाहने भरधाव वेगात असतात. त्यामुळे अरूंद रस्त्यांवर अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे पोलीस प्रशासन, महसूल प्रशासनाने अशा वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

अधिकाऱ्यांच्या रंगीत संगीत पार्ट्या

स्थानिक पोलीस, महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि वाळू तस्कर यांचे घनिष्ठ संबंध आहेत. याच संबंधातून गेवराई तालुक्यातून अवैधरित्या बेसुमार वाळू उपसा केला जात आहे. या माधमातून मोठी माया या सर्वांनी जमा केली आहे. हे सर्व रंगीत संगीत पार्ट्या करीत असतात, अशी जोरदार नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे.

## सामाजिक कार्यकर्ते राजेश दिवटे यांचे कार्य प्रेरणादायी आहे–वृक्षमित्र अरुण पवार



बीड (प्रतिनिधी)

यशवंती आधार सामजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते श्री.राजेश बाबासाहेब दिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त शंभर झाडाची लागवड सिद्धबेट आळंदी या ठिकाणी करण्यात आली यावेळी वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावण्यात आली यामध्ये चिंच,जांभळ,आंबा, आवळा, कारंजी,लिंब ,वड,पिंपळ बदाम इत्यादी झाडांची प्रामुख्याने लागवड करण्यात आली या वेळी प्रमुख पाहुणे वृक्षमित्र अरुण पवार साहेब म्हणाले यशवंती आधार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजेश दिवटे यांनी राबवलेला वृक्ष लागवडीचा उपक्रम खरच सर्वांसाठी प्रेरणादायी आहे वाढत्या उन्हाच्या चटक्याने आज अनेकांचे जीव गेले आहेत भविष्यत ही परिस्थिती अजून गंभीर होईल निसर्गाने आपल्याला बरेच काही शिकवल आहे. काळाचे पाऊल ओळखून सर्वांनी वेळी सावध होऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड आपण केली पाहिजे.

झाडे लावा झाडे जगवा या संस्थेच्या प्रेरणाचा उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. या वेळी गायनाचार्य नारायण महाराज यमगर, विषुभाऊ कुऱ्हाडे,संतोष सुरवसे, डॉ. सुनील वाघमारे, विठ्ठल शिंदे, दिनेश कुऱ्हाडे,किशोर काळदाते, जनार्दन पितळे, बडगुजर साहेब, आदी मान्यवर उपस्थित होते.

## सौ.के.एस.के. महाविद्यालयास नॅकचा अ दर्जा

बीड (प्रतिनिधी)

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास नॅक मुल्यांकन अ दर्जा प्राप्त झाला आहे, अशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी दिली आहे. दि.२७ व २८ मे २०२४ दरम्यान नॅक पुर्नमुल्यांकनाची चौथी सायकल नुकतीच पार पडली होती. महाविद्यालयास नॅकची समिती अध्यक्ष डॉ.रत्नेश गुप्ता, देवी अहिल्या विश्वविद्यालय, इंदोर (मध्यप्रदेश), समन्वयक डॉ.अनुपम महाजन, दिल्ली विद्यापीठ दिल्ली, सदस्य डॉ.मोहेंदर कुमार गुप्ता, पंडीत जवाहरलाल नेहरू शासकीय पदव्युत्तर महाविद्यालय फरिदाबाद (हरियाणा) यांनी महाविद्यालयाचे मुल्यांकन केले. यामध्ये क्रीडा विभाग, संगीत विभाग, नाट्यशास्त्र, ग्रंथालय, मुलींचे वसतिगृह, विज्ञान विभाग, वाणिज्य विभाग, कला




विभाग, एनएसएस, एनसीसी, कार्यालय, आयक्युएसी, प्राचार्य कार्यालय आदी विभागांना भेटी दिल्या. तसेच संस्था चालक, शिक्षक, पालक, आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. महाविद्यालयाच्या प्रगतीत विद्यार्थी पालक यांचा सहभाग आणि योगदान या विषयी चर्चा करून आपला अहवाल सादर केला. महाविद्यालयाची मागील पाच वर्षाची एकूण प्रगतीचे सात निकषांच्या आधारे मुल्यांकन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयास ३.१५ (सी.जी.पी.ए.) मिळाला असून अ दर्जा प्राप्त झाला आहे. हा दर्जा सातत्य टिकवत सलग तिसर्यांदा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे, सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर, प्राचार्य डॉ.एस.व्ही. क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.सतीश माऊलगे, आयक्युएसी समन्वयक डॉ.सोनाजी गायकवाड, कमवि उपप्राचार्य डॉ.एन.आर. काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर, डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधिक्षक डॉ.विश्वांभर देशमाने, आयक्युएससी सदस्य डॉ.एस.के.जोगदंड, डॉ.ए.एस.खान, डॉ.आर.एम.गुळवे, डॉ.एस.एस. जाधव, डॉ.डी.डी.रामटेके, डॉ.जी.डब्ल्यु. श्रीमंगले यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी अभिनंदन केले.

## लोकसभेतील पंकजाताईंच्या पराभवामुळे बैलगाडा शर्यत पुढे ढकलली – राजेंद्र मस्के

बीड (प्रतिनिधी)

भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत निसटता पराभव झाला. या पराभवाने खचून काही युवकांनी आत्महत्या केल्या. अशा परिस्थितीत बैलगाडा शर्यत घेणे उचित वाटत नाही. २ जुलै दरम्यान होणारी बैलगाडा शर्यत स्थगित करून दसरा, दिवाळी दरम्यान बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जाईल अशी माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. मित्र मंडळाच्या वतीने भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या वाढदिवसानिमित्त २ जुलै दरम्यान शेतकरी व बैलगाडा शर्यत शौकिनांसाठी गेली दोन वर्षापासून पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर भव्य



बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जात आहे. परंतु लोकसभा निवडणुकीत लोकनेत्या पंकजाताईंचा झालेला निसटता पराभव समर्थक व कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागल्याने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बैलगाडा शर्यत पुढे ढकलली आहे. याची नोंद बैलगाडा शर्यत शौकीन व शेतकरी बांधवांनी घ्यावी असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

## भिमशक्तीच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी भिमराव सरवदे यांची नियुक्ती


अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी धर्मनिरपेक्षपणे लढणारी संघटना म्हणून भिमशक्तीची सर्वदूर ओळख आहे. भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष खासदार तथा महाराष्ट्र राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांनी स्वतःचे हस्ते नियुक्तीपत्र देवून भिमशक्तीच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी भिमराव सरवदे यांची नियुक्ती केली आहे.

येथील आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू कार्यकर्ते भिमराव सरवदे हे मागील वीस वर्षांपासून सामाजिक व दलित चळवळी मध्ये कार्यरत आहेत. चळवळी मध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रख्यात गायक आनंद शिंदे, आदर्श शिंदे, साहेबराव येरेकर यांचे कार्यक्रम घेऊन त्यांनी चळवळीच्या माध्यमातून प्रबोधनाचा वारसा जोपासला आहे. बांधिलकी जोपासत गोरगरीब, गरजू लोकांना दवाखाना असो, तहसील असो किंवा पोलिस स्टेशन येथे त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सरवदे हे कायमच जनसेवा करीत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन खासदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांच्या हस्ते सरवदे यांना नियुक्तीपत्र देवून त्यांची भिमशक्तीच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी भिमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक महासचिव मोहनराव माने, मुंबई प्रदेशाध्यक्ष शशिकांत बनसोडे भिमशक्ती अंधेरी पूर्वचे उद्धव अवचारे, सुमित भैय्या आवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. भिमराव सरवदे यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यातून स्वागत होत आहे.

भिमशक्तीच्या माध्यमातून चळवळीला बळ व हंडोरे साहेबांना ताकद देणार :

खासदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांनी बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी माझी नियुक्ती करून मोठी जबाबदारी सोपवली आहे. याचा मी स्विकार केला




आहे. त्यांच्या विश्वासाला कदापीही तडा जाऊ देणार नाही. पुढील काळात संघटना बांधणी करून, संघटनेच्या सर्व आजी - माजी पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन भिमशक्तीच्या माध्यमातून चळवळीला बळ व हंडोरे साहेबांना ताकद देणार आहोत.

– भिमराव सरवदे

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ प्रस्ताव मंत्रिमंडळ मान्यतेसाठी सादर करावा; कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश

मुंबई (प्रतिनिधी)

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा मंजुरीचा प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे निर्देश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोनच्या आढाव्यासाठी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये अंदाजित ६ हजार कोटी किंमतीचा दुसरा टप्पा राबविण्यास शासनाने जून २०२३ मध्ये तत्वतः मान्यता दिलेली आहे. पहिल्या टप्प्यात ५२८४ गावांचा समावेश होता तर दुसऱ्या टप्प्यात ६,९५९ गावांचा समावेश असेल. यासाठी जागतिक बँक अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे.



या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात शासनाने निश्चित केलेले शेती उत्पादकता वाढविणे, पाण्याचा कार्यक्षम वापर, शेतीमध्ये कर्बग्रहण वाढविणे हे उद्देश साध्य तर साध्य करावेच. शिवाय शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले धान्य प्रक्रिया करून साठवणूक करण्याची यंत्रणा उभी करावी. तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी संशोधन व्हावे. तसेच शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणाऱ्या व विद्यापीठांनी विकसित केलेला छोटच्या यंत्रांचा वापर होण्यासाठी सुद्धा या प्रकल्पातून प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा यावेळी कृषी मंत्री मुंडे यांनी व्यक्त केली.

या बैठकीस नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रधान सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त रावसाहेब भागडे, कृषी उपसचिव संतोष कराड यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी उपस्थित होते



**बीड़/प्रतिनिधी**

**बीड शहरातील प्रभाग क्रमांक १९ मध्ये खूप दिवसा पासुन स्टेट लाईट बंद पडले ले आहे त्यामुळे सगळ्या वार्डात अंधार पसरला आहे आणि रस्ते नसल्या मुळे सगळ्या रस्त्यावर खड्डे आहेत आणि नागरिकांना खूप त्रास सहन करावे लागते,आणि नाल्या सुद्धा खूप दिवसा पासुन काढून घेतली नाही त्या मुळे सगळ्या नाल्या चोकाप हून घान पाणी रस्त्यावर आला आहे आणि वार्डात घाणीचे साम्राज्य पसरले आहे आणि संबंधित अधिकार्यांना सांगून सुद्धा ते दुर्लक्ष करीत आहे आणि काम करत नाही तरी मा. मुख्याधिकारी साहेबांना विनंती करण्यात येते की आपले संबंधित अधिकारी यांना सांगून लवकरात लवकर याभागात ले नागरिकांचे अडचणी दूर करण्यात यावी ही नम्र विनंती नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल एम आए एम वार्ड अध्यक्ष शेख नेहाल अहेमद, शेख आनिस भाई, शेख मोसिन भाई, आदींची उपस्तिथि होती**

# स्थानिक गुन्हे शाखा,बीड ने बीड सह पुणे, छ.संभाजीनगर, सातारा, जालना जिल्ह्यात मोटार सायकल चोरी

आंतरजिल्हा टोळी पकडुन १६ मोटार सायकली जप्त करुन ०९ गुन्हे उघड करुन ०३ आरोपींना केले जेरबंद मा.पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून मा.पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने पोउपनि संजय तुपे यांचे पथक माजलगाव व गेवराई उपविभागात मोटार सायकल चोरीच्या घटनेच्या आरोपींची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, इसम नामे १) अभिजीत सटवा वाघमारे, २) आदित्य सटवा वाघमारे, ३) शहादेव भिवाजी अवघडे यांनी काही दिवसांपुर्वी मोटार सायकल चोरी केलेल्या असून ते सध्या तलवाडा ते माजलगाव जाणाऱ्या रोड वरील हिवरा



फाटाजवळ उभे असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली तेव्हा सदरची माहिती पोलीस निरीक्षक स्थागुशा यांनी कळवुन त्यांनी तात्काळ माहितीची खात्री करुन मोटार सायकलचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले.

पोउनि संजय तुपे व त्यांचे पथक यांनी बातमी ठिकाणी जावुन शिताफीने तीन इसमांना ताब्यात घेवुन बारकाईने विचारपुस केली असता त्यांनी माजलगाव शहर येथील एक पल्सर मोटार सायकल चोरी केली असुन सदर मोटार सायकलची खात्री केली असता माजलगाव शहर १४९/२०२४ क.३७९ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद असल्याची माहिती मिळाली तेव्हा तीन इसमांना अधिक विचारपुस केली असतां त्यांनी पुणे जिल्हयातुन-०२, जालना जिल्हयातुन-०५, छत्रपती संभाजीनगर जिल्हयातुन ०२, सातारा जिल्हयातुन-०५, परभणी जिल्हयातुन-०२, मोटार सायकली चोरी केल्याची माहिती दिली असुन त्यांचे ताब्यात खालील नमुद प्रमाणे एकुण १६ मोटार सायकली कि.अं.९,९०,०००/- रु चा मुद्येमाल जप्त करण्यात आलेल्या आहेत. आरोपी नामे १) अभिजीत सटवा वाघमारे वय २१ वर्षे, २) आदित्य सटवा वाघमारे वय १९ वर्षे, ३) शहादेव भिवाजी अवघडे वय २३ वर्षे सर्व रा.हिवरा ता.माजलगाव यांना व मोटार सायकलचा मुद्येमाल पो.स्टे.माजलगाव शहर यांचे ताब्यात देण्यात आलेला असुन पुढील तपास माजलगाव शहर व स्थागुशा करीत आहेत. सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष साबळे पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, श्री. केतन राठोड पोलीस निरीक्षक माजलगाव शहर, पोउपनि श्री. संजय तुपे, सफौ/हनुमंत खेडकर, पोह/कैलास ठोंबरे, नसिर शेख, अशोक दुबाले, भागवत शेलार, देविदास जमदाडे, तुषार गायकवाड, निलेश ठाकुर, मच्छिंद्र बीडकर, पोशि/बप्पा घोडके, विकी सुरवसे, चालक गणेश मराडे यांनी केलेली आहे.

# ओबीसी समाजाच्या वतीने नाळवंडी येथे आमरण उपोषणाला सुरुवात

**नाळवंडी । प्रतिनिधी**
**प्रा.लक्ष्मण हाके दत्त मंदिर वडीगोद्री ता.अंबड जिल्हा जालना येथे ओबीसी समाजाच्या वतीने चालू असलेल्या आमरण उपोषणास जाहीर पाठिंबा म्हणून नाळवंडी मधील ओबीसी समाजाचा लढवय्या संजय आबाराव काळे यांच्या वतीने आणि नाळवंडी गावातील ओबीसी समाज बांधवांचा वतीने आज पासून आमरण उपोषणाला सुरुवात झाली,या ठिकाणी ओबीसी समाजाच्या मागण्या घेऊन हे उपोषण उभारण्यात आले आहे ,मराठा समाजाला ओबीसी मधून दिलेले आरक्षण तत्काळ रद्द करण्यात यावे, सगे सोयरे अध्यादेश त्वरित रद्द करण्यात यावा, ओबीसींच्या समाजाच्या**




**सर्व पोटजातींची जनगणना त्वरित करण्यात यावी,**
या मागण्या घेऊन वडीगोद्री येथे चालू असलेल्या आमरण उपोषणाला आज नाळवंडीतील ओबीसी समाज बांधवांच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला, त्याचबरोबर ओबीसी समाजाचे लढावय्या संजय आबाराव काळे यांनी जो पर्यंत संपूर्ण मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत अन्न त्याग करण्याचे यावेळी वर्तवले आहे,या ठिकाणी या उपोषणादरम्यान काही वाईट परिस्थिती निर्माण झाली किंवा काही जिवीत हानी झाली तर याची सर्वस्वी जबाबदारी महाराष्ट्र सरकारची असेल असे यावेळी ओबीसी समाज बांधवांच्या वतीने जाहीर करण्यात आले,या आमरण उपोषणाचा आजचा पहिला दिवस,या उपोषणाला अनेक ओबीसी समाज बांधव दिसत आहेत.

# जोगाईवाडी ग्रामपंचायतचा विकास फक्त कागदावरच-लोक जनशक्ती पार्टी

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरा लगत असलेली ग्रामपंचायत तथा तालुक्यातील सर्वात श्रीमंत मानली जाणारी ग्रामपंचायत विकासापासून दूर असल्याचे दिसून येत आहे अंबाजोगाई शहर व आजूबाजूचा परिसर झपाट्याने वाढत आहे यामध्ये जोगाईवाडी अंतर्गत येणारा खूप मोठा परिसर आहे यामधे वरद पार्क फेस वन फेस टू सारडा नगरी योगेश्वरी नगरी सिल्वर सिटी या अशा अनेक उच्चभ्रू वस्त्या या परिसरामध्ये आहेत परंतु या वस्त्यांना ज्या भौतिक सुख सुविधा जोगाईवाडी ग्रामपंचायत च्या वतीने देण्यात आल्या पाहिजे होत्या त्यातील कुठल्याच सुविधा ग्रामपंचायतच्या वतीने देण्यात येत नाहीत मागील दोन वर्षा पूर्वी ग्रामपंचायत मध्ये



सत्तांतर झाले येथील जनतेने सुशिक्षित असे सरपंच निवडून दिले परंतु वरद पार्क असेल सारडा नगरी असेल योगेश्वरी नगरी असेल सिल्वर सिटी असेल येथे रस्त्यांचे नाल्यांचे स्ट्रीट लाईटचे स्वच्छतेचे पाणीपुरवठ्याचे अनेक प्रश्न उद्भवत आहेत विशेष करून या ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवक हे मनमानी कारभार करत असल्याचे वारंवार दिसून येत आहे अशा काम चुकार ग्रामसेवकाची मुख्यालयीन बदली करण्यात यावी व त्यांच्याकडून अशा मोठ्या उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीचे सर्व अधिकार काढून घेण्यात यावे याचे मुख्य कारण असे की जर प्रशासकीय अधिकारीच जनतेला सुविधा पुरविण्यात असमर्थ असेल तर दाद कोणाकडे मागायची याचाच निषेध म्हणून आज दिनांक १८/ ६ /२४ रोजी लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने गटविकास अधिकारी दिवाणे मॅडम यांना निवेदन देण्यात आले जर लवकरात लवकर या रहिवासी कॉलनींना सुविधा पुरवल्या गेल्या नाही तर लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने ग्रामपंचायत समोर किंवा गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल.

# भारतीय कॉंग्रेस पक्षाच्या अभूतपूर्व यशाबद्दल खासदार रजनी पाटील यांचा सत्कार

## आगामी निवडणुकीत जीवाचं रान करू -दत्ता कांबळे

**माजलगाव (प्रतिनिधी)**
**विजय कापसे नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय कॉंग्रेस पक्षाला अभूतपूर्व यश मिळत सर्वाधिक १४ खासदार निवडून आले असून, कॉंग्रेस पक्ष हा राज्यातील अव्वल क्रमांकाचा पक्ष झाला आहे.काल रोजी अखिल भारतीय पक्षाच्या वरिष्ठ नेत्या तथा गांधी परिवाराच्या अत्यंत विश्वासू असणाऱ्या खासदार सौ. रजनीताई पाटील या जिल्हा नियोजन समितीची बैठक व कार्यकर्त्यांच्या भेटी गाठीचे औचित्य साधून जिल्हा दौऱ्यावर आल्या होत्या.**



यावेळी महाराष्ट्रातील भारतीय कॉंग्रेस पक्षाच्या अभूतपूर्व यशाबद्दल जिल्हा कॉंग्रेस तथा अखिल भारतीय कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्या खासदार सौ. रजनीताई अशोकराव पाटील यांचं भारतीय कॉंग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा परळी विधानसभा मतदार संघांचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी प्रमुख सहकार्यांच्या समवेत केज येथील शिवनेरी निवासस्थानी गुलाब पुष्पहार सह हृदय सत्कार केला. यावेळी खासदार रजनीताई पाटील यांनी कॉंग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी घेतलेले परिश्रमाचे आणि सर्वांगीण राजकीय पैलूवर लक्ष वेधत दत्ता कांबळे यांचे भरभरून कौतुक केले. यावेळी निवडणुकाच्या पार्शवभूमीवर चर्चा करत असताना परळी विधानसभा मतदार संघांचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी आगामी निवडणूक काळात खासदार सौ. रजनीताई पाटील,माजी मंत्री अशोकराव पाटील, जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आपण जीवाचं रान करू अशी ग्वाही खासदार रजनीताई पाटील यांना दिली. यावेळी जिल्हा कॉंग्रेसचे नेते आदित्य पाटील,जिल्हा उपाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील, अनंत घडसिंगे, नानासाहेब कसबे, संकेत कासार सह कार्यकर्ते उपस्थित होते.



# मनूर येथील जि प शाळेच्या खोल्यांची दयनिय अवस्था शिक्षण विभागाचे दूर्लक्ष

माजलगाव । विजय कापसे

तालुक्यातील मनूर येथील जिल्हापरिषद शाळेच्या खोल्या मृत्यूचा सापळा बनत चालल्या असुन संतप्त गावकर्यांची शिक्षण विभागात शाळा भरवण्याचा रोष निर्माण होत आहे, वेळोवेळी येथील शिक्षकांनी शाळा दूरूस्तीचे प्रस्तावही पाठवले असताना प्रशासन केवळ केराची टोपली दाखवत असून एखाद्या विद्यार्थ्याचा बळी गेल्या नंतर शिक्षण विभाग प्रशासनाला जाग येईल का असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते अशोक ढगे यांनी व्यक्त केला आहे. सध्या पावसाचे दिवस असुन शाळेचा छत कोणत्याही क्षणी पडू शकतो अशी येथील शाळेच्या खोल्यांची अवस्था झाली आहे .

गटसाधन कार्यालयाने वेळीच दखल घेवुन परवड थांबवावी नसता मनूर येथील नागरीक , पालक स्वतः विद्यार्थ्यांना सोबत घेवुन गटसाधन केंद्रातच शाळा भरवतील असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने या वेळी देण्यात आला असल्याचे सांगितले आहे.

# अखेर १० वर्षांपासून पत्र्याच्या शेडमध्ये भरणा-या बेलगाव येथील कोळपे वस्तीवरील विद्यार्थ्यांना शाळा ईमारत मिळाली :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील बेलगाव ग्रामपंचायत अंतर्गत अंदाजे १५० च्या आसपास लोकसंख्या ऊसतोड मजूर, शेतकरी असलेल्या मुलांसाठी जिल्हा परिषद शाळेसाठी ईमारत नव्हती.१० वर्षांपासून ग्रामस्थांनी उभारलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरवली जात असे.मात्र पावसाळ्यात वादळीवाऱ्यासह पावसाने शालेय मुलांचे हाल होत होते.यासंबधी शाळेतील शिक्षक यांनी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी शासन दरबारी पाठपुरावा केल्यानंतर अखेर गेल्यावर्षी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १० लाख रुपये दिल्यानंतर वस्तीवरील ग्रामस्थांनी ६ गुंठे जमीन दानपत्र करून दिल्यानंतर यावर्षी पत्र्याच्या शाळेतुन नविन इमारतीमध्ये शाळा भरण्यास सुरुवात झाली आहे.आणि अखेर कोळपे वस्तीवरील मुलांचा ईमारतीचा प्रश्न सुटला आहे.

**१० वर्षांपासून शाळा ईमारतीचा प्रश्न सुटला :- निरा गर्जे ( शिक्षिका)**

सन २०१४ पासुन बेलगाव येथील वस्तीशाळेवर मी आणि सहशिक्षिका चंद्रकला सिरसट कार्यरत असुन सुरूवातीला पत्र्याच्या शेडमध्ये मुलांची सोय करण्यात आली होती.परंतु पावसाळ्यात मुलांचे जास्त हाल होत.याविषयी लोकप्रतिनिधी गावचे सरपंच व शिक्षण विभागाला शाळेच्या अडचणी विषयी कळवण्यात आले होते. लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी शासनदरबारी व प्रसिद्धी माध्यमातुन मुलांच्या व्यथा मांडल्या.अखेर पत्र्याच्या शेडमधील



मुलांना शाळा ईमारत मिळाली याचा मनस्वी आनंद होत आहे.

**ग्रामस्थांनी ६ गुंठे जमीन शाळेसाठी दान दिली:- सुखदेव कोळपे ( उपसरपंच बेलगाव)**

वस्तीवरील शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय दूर व्हावी यासाठी वस्तीवरील कोंडीबा लक्ष्मण कोळपे,ईश्वर परमेश्वर कोळपे, सुभाष विठ्ठल कोळपे, ज्ञानोबा येडोबा कोळपे यांनी एकत्रितपणे ६ गुंठे जागा शाळेसाठी दान दिली आहे.त्यावर वर्षभरात नविन ईमारत बांधण्यात आली असुन ग्रामपंचायतने शाळेसाठी बोअरवेल व पिण्याच्या पाण्याच्या टाकीची सोय केली आहे. यासाठी माजी सरपंच अश्विन शेळके, विद्यमान सरपंच अशोक शेळके आणि ग्रामस्थांचे सहकार्य लाभले आहे.

बेलगाव येथील कोळपे वस्तीवरील विद्यार्थ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये ज्ञानार्जन करावे लागत असुन शाळा इमारतीसाठी निधी द्यावा यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड अजित पवार आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीकांत कुलकर्णी यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. जिल्हा नियोजन निधीतून तरतूद करण्याचे आश्वासन दिले होते.बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत. लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने व निधी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या अक्षरशः मोडकळीस आलेल्या धोकादायक आहेत

## राजेंद्र मस्के यांनी शाळा इमारतीसाठी १० लाख रुपये निधी दिला

वस्तीशाळा शिक्षक निरा गर्जे, तत्कालीन सरपंच अश्विन शेळके, विद्यमान सरपंच अशोक शेळके, उपसरपंच सुखदेव कोळपे व वस्तीवरील ग्रामस्थांनी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांना वस्तीशाळेच्या इमारतीसाठी निधी मागितल्यानंतर गेल्यावर्षी राजेंद्र मस्के यांनी जिल्हा नियोजन आयोगाच्या निधीतून १० लाख रुपये उपलब्ध करून दिले. बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज यांच्या शुभहस्ते राजेंद्र मस्के, मजुर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ , डॉ.गणेश ढवळे, विस्तार अधिकारी श्रीधर शेळके, सरपंच अशोक जाधव, उपसरपंच सुखदेव कोळपे व ग्रामस्थांच्या उपस्थितीत नविन शाळा ईमारत बांकामाचे भुमिपुजन करण्यात आले होते.



## ऋग्वेद व ऋचा यांचा गौरव

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नवोदित संगीतकार व्हि आर ऋग्वेद व गायिका ऋचा यांचा प्रतिष्ठान तर्फे गौरव करण्यात आला. संगीतकार व्हि आर ऋग्वेद व गायिका ऋचा यांनी नुकतेच प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपट अल्ल्याड पल्याड मध्ये संगीत व पार्श्वगायन दिलेले आहे. यानिमित्त दोन्ही बहीण भावंडांचा गौरव करण्यात आला. यावेळी कमलाकर देशपांडे, प्रा.पी.व्ही. कुलकर्णी, प्रा रवींद्र पाठक, प्रा आर.वाय. कुलकर्णी, विभा कुलकर्णी पेशवा प्रतिष्ठानचे डॉ.महेश अकोलकर,डॉ. संकेत तोरंबेकर,श्रीकांत जोशी ,अक्षय देशमुख, राघव कुलकर्णी,पार्थ कानसुरकर, कल्याणी कुलकर्णी,रेणुका भालेराव,रोहिणी जड आदी उपस्थित होते. ऋचा कुलकर्णी हिने सांगितले की, कोरोना मध्ये सर्व जग ठप्प झाले होते, अश्यावेळी आम्ही वेळेचा सदुपयोग करून गायन व संगीत यावर भर दिला. एखाद्या चित्रपटात संगीत देणे ही फार मोठी उपलब्धि असल्याचे मत ऋग्वेद याने व्यक्त केले. ऋग्वेद व ऋचा यांचे अभिनंदन करून पुढील कारकिर्दीस सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT